**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.९/कँप पुणे/३३०
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : **३१.०३.२०२०.**

# परिपत्रक

**विषय** : कोरोना विषाणू (कोविड-१९) च्या संक्रामक गुणधर्मामुळे उत्पन्न झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमधील कृतीशिल उपाय योजना.

**संदर्भ** : १) परिपत्रक क्र. मासंवि/रवका/न.क्र. ९/८७४९ दि. १८.०३.२०२०.
२) परिपत्रक क्र. मासंवि/रवका/न.क्र. ९/८९२९ दि. २०.०३.२०२०.
३) परिपत्रक क्र. मासंवि/रवका/न.क्र. ९/कँप पुणे दि. २२.०३.२०२०.
४) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे दि. २९.०३.२०२० चे पत्र.

---------

सध्या जगभराज पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण विचारात घेता सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासन स्तरावर व त्यानुषंगाने कंपनी स्तरावर प्रतिबंधात्मक उपाय योजना लागू करुन सविस्तर सूचना जारी केलेल्या आहेत. याच सूचनांचा भाग म्हणून कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येच्या ५० टक्के एवढे मनुष्यबळ कार्यालयात उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना व २५ टक्के उपस्थिती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, पुणे पिंपरी-चिंचवड आणि नागपूर परिक्षेत्राअंतर्गत ठेवण्याबाबत सविस्तर सूचना उपरोक्त संदर्भिय क्र. १ व २ अन्वये पारित करण्यात आलेल्या आहेत. तसेच संदर्भिय क्र. ३ अन्वये कार्यालयीन उपस्थितीमध्ये कपात करुन ती ५ टक्के करण्याबाबत व उर्वरित कर्मचारीवृंदांना घरुन काम करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदरच्या सूचना या कंपनीच्या कार्यक्षमतेमध्ये बाधा न येता दि. ३१.०३.२०२० पर्यंत लागू करण्यात आलेल्या आहेत.

२. सद्यस्थितीत गृह संचालनालय, भारत सरकार यांचे मार्फत संदर्भिय क्र. १० अन्वये दि. २५.०३.२०२० पासून पुढील २१ दिवसांच्या कालावधीकरीता संपूर्ण देशभरात संचारबंदी व जमावबंदी लागू करण्यात आली आहे. देशभरातील सदरील परिस्थतीचा विचार करता सर्व सक्षम अधिकारी हे प्रशासकीय कार्यालयामधील उपस्थिती जास्तीत जास्त ५ टक्के पर्यंत राखण्याबाबतच्या सूचना पुढे सुरु ठेवून उर्वरित कर्मचारीवृंदाना घरुन काम करण्याबाबत परवानगी देवू शकतील. सदरच्या सूचना या कंपनीच्या कार्यक्षमतेमध्ये बाधा न येता दि. १४.०४.२०२० पर्यंत लागू करण्यात येत आहेत.

३. सदरचे परिपत्रक तात्काळ अमंलात येईल.

४. सदरचे परिपत्रक कंपनीच्या ई-लायब्ररी येथे उपब्ध करण्यात आलेले आहे.

**कमांडर शिवाजी इंदलकर (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**